ePaper

**दगडूशेठ गणपती ट्रस्टच्या वतीने सामूहिक अथर्वशीर्ष पठण, 31 हजार महिलांची उपस्थिती**

| वर्ष - 6 । अंक - 144 | UDYAM-MH-26-0158827 |

महाईन्यूज™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

बाप्पा मोरया...

www.mahaenews.com | गुरुवार। दिनांक 1 सप्टेंबर 2022 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews



# श्रीगणेशाला 'जलाभिषेक'!

## पावसाच्या सरीत गणरायाचे आगमन : उद्योग नगरीत भक्तीमय वातावरण

**पिंपरी।**
**। महाईन्यूज । प्रतिनिधी।**

औद्योगिक नगरी असलेल्या पिंपरी चिंचवडमध्ये बुधवारी लाडक्या गणरायाचे जल्लोषात स्वागत करण्यात आले. मंडळे, सोसायटी व कार्यालयांमध्ये स्थापना करण्यात आली. गेली दोन वर्षे कोरोना महामारीमुळे लॉकडाऊनची निर्बंध होते. त्यामुळे सार्वजनिक ठिकाणी गणेशोत्सव साजरा करण्यावरही निर्बंध होते. त्यामुळे कमी उत्साहात गणेशोत्सव साजरा करण्यात आला. यावर्षी असे कोणतेही निर्बंध नसल्याने गणेश भक्त व गणेश मंडळे यांच्यामध्ये गणपती बाप्पाचे स्वागत करण्यासाठी प्रचंड उत्साह दिसून येत होता.

शहरातील सर्व भागात गणेश भक्तांच्या घरात सकाळपासून आनंदाचे वातावरण होते. शुभ मुहूर्ताच्या कालावधीत गणरायाची स्थापना व्हावी, यासाठी गणेश भक्त त्यांच्या कुटुंबियांबरोबर सकाळी बाजारात जाऊन बुकिंग केलेली मूर्ती घेत असल्याचे चित्र सर्वत्र दिसत होते. दुचाकी, तीन चाकी व कारमधून मूर्ती घरी घेऊन जात होते. तसेच काही गणपती मंडळाचे कार्यकर्ते देखील त्यांच्या मंडळासाठीची गणपती मूर्ती घेण्यास बाजारात आले असल्याचे पाहायला मिळत होते. पूर्ण शहरामध्ये 'मोरया मोरया गणपती मोरया'चा जयघोष होता. शहरामध्ये संध्याकाळी चारच्या सुमारास विविध भागात हलका पाऊस झाला. त्यामुळे थोडा वेळ गणेश भक्त दुकानांमध्येच थांबून राहिले व त्यानंतर गणपती मूर्तीची मिरवणूक काढण्यात आली. तर, काही जोरदार पाऊस असतानाच मिरवणूक काढण्यात आली.

### ढोलताशा पथकाच्या गजरात बाप्पांचे आगमन

गौरव देसाई म्हणाले की, "माझ्या घरी शाडू मातीपासून बनवलेल्या गणपती मूर्तीची स्थापना करण्यात आली आहे. काही सोसायटींमध्ये राहणाऱ्या 25 जणांचे ढोल ताशा पथक तयार करण्यात आले आहे. या पथकाने मिरवणुकीत ढोल ताशा वादन केले.

**यावर्षी असे कोणतेही निर्बंध नसल्याने गणेश भक्त व गणेश मंडळे यांच्यामध्ये गणपती बाप्पाचे स्वागत करण्यासाठी प्रचंड उत्साह दिसून येत होता.**



### शाडू मातीपासून बनवलेल्या गणपती मूर्तीची स्थापना

यावर्षी पर्यावरण पूरक गणेशोत्सव साजरा करण्याकडे लोकांचा जास्त कल दिसून येत आहे. पुनवळे येथील अभिषेक वाळवेकर (सदस्य, डी. एस. के. कुंजबन कोऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी) म्हणाले की, "आमच्या फेडरेशनमधील सर्व सोसायटींमधील रहिवाशांसाठी शाडूच्या मातीपासून गणपती मूर्ती बनवण्याची कार्यशाळा घेण्यात आली. त्यामध्ये 60-70 मुले व त्यांच्या पालकांनी सहभाग घेतला. कार्यशाळेत बनविलेल्या गणपती मूर्तीची स्थापना आज त्यांनी आपल्या घरी केली. माझ्या घरी देखील शाडू मातीपासून बनवलेल्या गणपती मूर्तीची स्थापना करण्यात आली."

# प्रतिभा प्रतिष्ठानचा महिला सक्षमीकरणचा वसा

## स्वयंपाकघर नूतनीकरण सुरू: अश्विनीताई जगताप यांची उपस्थिती

**पिंपरी।**
**। महाईन्यूज । प्रतिनिधी।**



पिंपळे गुरव मोरया पार्क येथे प्रतिभा महिला प्रतिष्ठानच्या महिलांचे नवीन स्वयंपाकघराचे नूतनीकरणाचे उद्घाटन प्रतिभा महिला प्रतिष्ठानच्या अध्यक्षा अश्विनीताई लक्ष्मणभाऊ जगताप यांच्या शुभ हस्ते पूजन करून व फीत कापून झाले. तसेच त्या प्रसंगी प्रतिभा महिला प्रतिष्ठानच्या अध्यक्ष अश्विनीताई लक्ष्मणभाऊ जगताप या म्हणाल्या की, महिला सक्षमीकरण करण्यासाठी आमचे महिला प्रतिष्ठान कित्येक वर्षापासून काम करीत आहे या कामामधून

आम्ही महिलांसाठी नवनवीन रोजगार निर्माण करीत आहोत, या कामांमुळे महिलांना आपल्या पायावरती उभे राहण्याची संधी उपलब्ध करून देत आहोत.

त्यावेळी माजी.नगरसेवक शंकरशेठ जगताप,माऊलीशेठ जगताप,शशिकांत कदम,सागर आंघोळकर, संजय जगताप, नवनाथ जांभुळकर, संजय मराठे,सोपान तात्या जांभुळकर,सुनिल देवकर,महाराष्ट्राचे सुप्रसिद्ध गायक अनिल गायकवाड व सामाजिक कार्यकर्त्या प्रतिभा चव्हाण,संगीता ढिकले, कल्पना शिंदे,ज्योती कोळी, सुनिता कुवर,मनीषा हंगरगे, स्वाती गुरव, उज्वला वाघमारे आदी मान्यवर व नागरिक या उद्घाटन प्रसंगी उपस्थित होते.

# "पुण्याला कुणीच वाली राहिला नाही", नीलम गोऱ्हेंच्या टीकेला चंद्रकांत पाटलांचं प्रत्युत्तर!

## विधान परिषदेच्या विधीमंडळ अधिवेशनात पुण्याचे प्रश्न मांडल्यावरून नीलम गोऱ्हे यांची टीका



पुणे ।
। महाईन्यूज । प्रतिनिधी।

**विधान परिषदेच्या उपसभापती आणि शिवसेना नेत्या नीलम गोऱ्हे यांनी विधीमंडळ अधिवेशनात पुण्याचे प्रश्न मांडले न गेल्यावरून जोरदार टीका केली. तसेच पुण्याचे प्रश्न न मांडले गेल्याने अनेक प्रश्न प्रलंबित राहिल्याचा आरोप करत पुण्याला कुणीच वाली राहिला नसल्याचा टोला पुण्यातील भाजपा आमदारांना लगावला. यावर राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री व भाजपा नेते चंद्रकांत पाटील यांनी प्रत्युत्तर दिलं. "नीलम गोऱ्हे यांना पुण्याचे प्रश्न सोडवण्यापासून कुणी अडवलं नव्हतं," असं मत चंद्रकांत पाटलांनी व्यक्त केलं.**

चंद्रकांत पाटील म्हणाले, "एकतर नीलम गोऱ्हे सभापती म्हणून स्वतःचे अधिक अधिकार वापरतात. ते त्यांनी पुण्यासाठी वापरायला अडचण नव्हती. खरंतर सभापतींनी सर्वांचं ऐकायचं असतं. परंतू, सदस्यांपेक्षा त्याच जास्त बोलतात. सभापतींनी पक्षाचा प्रवक्ता बनायचं नसतं, तर या पक्षाचा प्रवक्ता बनतात. त्यांना पुण्याचे प्रश्न सोडवण्यापासून कुणी अडवलं नव्हतं." "त्यांनी पुण्यासाठी काय काय केलं याची यादी द्यावी"

"अडीच वर्षांचं सरकार होतं, थोडंथोडकं नाही. त्या काळात त्यांनी पुण्यासाठी काय काय केलं याची यादी द्यावी," अशी मागणीही चंद्रकांत पाटलांनी केली.

> **"अडीच वर्षांचं सरकार होतं, थोडंथोडकं नाही. त्या काळात त्यांनी पुण्यासाठी काय काय केलं याची यादी द्यावी," अशी मागणीही चंद्रकांत पाटलांनी केली.**

### "पालकमंत्री नाही म्हणून काही थांबलेलं नाही"

चंद्रकांत पाटलांनी पालकमंत्र्यांच्या नियुक्तीला होणारी दिरंगाई यावरही भाष्य केलं. ते म्हणाले, "दोघेच मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री होते त्या काळातही निर्णय घेणं थांबवलेले नाहीत. नंतर मंत्रीमंडळ विस्तार झाला आणि खातेवाटपाला उशीर झाला. त्यानंतरही कोणतेही निर्णय थांबले नाही. पालकमंत्री नसण्याचं मी समर्थन करत नाही, मात्र, पालकमंत्री नाही म्हणून काही थांबलेलं नाही. लवकरच पालकमंत्र्यांचीही नेमणूक होईल.

### राज्यात बहिष्काराच्या घटनांमध्ये वाढ

बैलपोळा साजरा केल्याने धुळ्यात दलित कुटुंबावर बहिष्कार घालण्याचा प्रकार घडला. यानंतर राज्यात इतरही ठिकाणी अशा घटना घडत असल्याचं समोर आलं. याबाबत विचारलं असता चंद्रकांत पाटील म्हणाले, "मी या घटनांची माहिती घेईन. या प्रत्येक घटनेचा सहृदयतेने, संवेदनशीलतेने दखल घेण्याचा प्रयत्न शासन करत आहे." "आम्ही गावोगावच्या अशा घटनांवर लक्ष ठेऊन आहोत. त्या घटनांमध्ये काय घडलंय हे पाहून कारवाई केली जाईल," असं आश्वासन पाटलांनी यावेळी दिलं.



# करोनाचे विघ्न टळल्याने दोन वर्षांनंतर पुण्यनगरी गणेशमय

## पारंपरिक मार्गावरुन निघाल्या देखण्या मिरवणुका

पुणे ।
। महाईन्यूज । प्रतिनिधी।

ढोल-ताशांचा निनाद, ध्वज घेऊन नर्तन करणारे कार्यकर्ते, मधुर सुरागवटींनी भारावून टाकणारे बँडपथकांतील कलाकारांचे वादन, 'गणपती बाप्पा मोरया'चा जयघोष अशा चैतन्यपूर्ण वातावरणात करोनाचे विघ्न टळल्याने दोन वर्षांनंतर जल्लोषात उत्सव साजरा करणारी पुण्यनगरी गणेशमय झाली. पारंपरिक मार्गावरून निघालेल्या छोटेखानी देखण्या मिरवणुका आणि मंत्रोच्चाराने भारलेल्या वातावरणात मानाच्या गणपतींची मुहूर्तावर विधिवत प्रतिष्ठापना करण्यात आली. प्रतिष्ठापना होईपर्यंत वरुणराजाने विश्रांती घेतल्याने कार्यकर्त्यांचा उत्साह द्विगुणित झाला होता.

करोना प्रादुर्भावाच्या दोन वर्षांच्या खंडानंतर बुधवारी वाजत-गाजत गणरायाचे आमगन झाले. दोन वर्षांची मरगळ झटकून गणेश मंडळांचे कार्यकर्ते आणि गणेशभक्त असे सारेच गणरायाच्या स्वागतासाठी सज्ज झाल्याचे चित्र शहरभर दिसून आले. लोकमान्यांच्या प्रेरणातून मुहूर्तमेढ रोवल्या गेलेल्या पुण्यनगरीच्या वैभवशाली गणेशोत्सवाला दिमाखात प्रारंभ झाला. करोना प्रादुर्भावामुळे दोन वर्षे साधेपणाने गणेशोत्सव साजरा करावा लागला होता. त्या पार्श्वभूमीवर यंदाचा गणेशोत्सव दुप्पट उत्साहाने साजरा होणार, याची चुणूक बुधवारी पहिल्याच दिवशी दिसली.

# गणेशोत्सवानिमित्त एक्झर्बिया ॲबोड, जांभुळ सोसायटीच्यावतीने बहारदार कार्यक्रमांचे आयोजन

## लहान मुले, महिला, तसेच युवकांसाठी विविध स्पर्धा, रक्तदान शिबीराचे आयोजन

वडगाव-मावळ ।
। महाईन्यूज ।
गणेश क्षिरसागर।

दोन वर्षानंतर गणेश उत्सव पुन्हा ढोल ताशाच्या गजरात, जल्लोषात साजरा होत आहे. यावर्षी प्रत्येक उत्सव मंडळ काहीतरी आगळे वेगळे करत आहे. त्यामुळे यंदा गणेश उत्सवाला अधिकच रंगत आली आहे. श्रीगणेशमूर्ती घरात आल्यावर आपल्या घरात आनंदाचे व चैतन्याचे वातावरण निर्माण झाले होते. घरात प्रसन्नता निर्माण होते. आप्तेष्ट मित्र यांच्या भेटी झाल्याने आनंद द्विगुणित होत असतो. चौदा विद्या आणि चौसष्ट कलांचा, ज्ञानाचा अधिपती बाप्पा गणराजाचे बुधवार दिनांक 31




रोजी गणपतीचे थाटामाटातआगमन झाले. मावळ तालुक्यातील वडगाव जांभुळ येथील एक्सर्बिया ॲबोड या सोसायटीच्या गणेशोत्सवाला आगळे वेगळे महत्त्व प्राप्त झाले आहे. त्याचे कारण म्हणजे गणेशोत्सवानिमित्त एक्झर्बिया ॲबोड, जांभुळ सोसायटीच्या वतीने 31 ऑगस्ट ते 9 सप्टेंबर दरम्यान विविध बहारदार कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. सोयायटीच्या प्रशस्त प्रांगणात मनोरंजनाचे खास कार्यक्रम आयोजित केल्याची माहिती मंडळाचे अध्यक्ष धनंजय वाणी, उपाध्यक्ष दीपक पाटील, खजिनदार पंढरीनाथ हिंगे, कार्यवाहक गणेश क्षिरसागर यांनी महाईन्यूजला दिली. तसेच सोसायटीच्या सर्व रहिवाशांनी या उत्सवात सहभागी होण्याचे आवाहन अध्यक्ष वाणी यांनी केले आहे.

### एक्सर्बिया अबोडच्यावतीने आयोजित कार्यक्रमाची रुपरेषा

- **31 ऑगस्ट रोजी दुपारी 1 ते सायंकाळी 6.30 वाजेदरम्यान, बाप्पांच्या आगमनानिमित्त मिरवणूक, स्थापना व आरती कार्यक्रम**
- **1 सप्टेंबर रोजी रात्री 9 ते 11 दरम्यान, जांभूळगाव येथील महिलां मंडळाचा भजनाचा कार्यक्रम**
- **2 सप्टेंबर रोजी रात्री 9 ते 10 दरम्यान, धनंजय वाणी यांचे अग्निरोधक मार्गदर्शनपर प्रशिक्षण शिबीर**
- **3 सप्टेंबर रोजी लहानग्यांसाठी पोते उडी, यामध्ये लहान तसेच मोठा गटही सहभागी होऊ शकणार आहे.**
- **5 सप्टेंबर रोजी सायंकाळी 7 ते 8 दरम्यान, मुला-मुलींच्या लहान, मोठ्या गटासाठी चित्रकला स्पर्धा तसेच महिलांसाठी रांगोळी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.**
- **6 सप्टेंबर रोजी सायंकाळी 7 ते रात्री 11 वाजेपर्यंत लहान व मोठ्या गटासाठी लिंबू चमचा स्पर्धा तसेच महिलांसाठी संगीत खुर्ची स्पर्धा होणार आहेत.**
- **7 सप्टेंबर रोजी रात्री 8.30 ते 11 मराठी चित्रपट अभिनेते, निवेदक, तळेगाव, इंदुरीचे अविनाश शिंदे यांचा सोसायटीमधील महिलांसाठी खेळ रंगला पैठणीचा या बहारदार कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.**

**सोसायटीमधील रहिवाशांनी जास्तीत जास्त नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देण्याचे आवाहन मंडळाच्या कार्यकारिणी कमिटीने केले आहे.**

# साडेतीन कोटी लुटणाऱ्यांच्या टोळीचा पर्दाफाश, रोख रक्कम जप्त!

## पुणे ग्रामीण पोलिसांची कारवाई : सहाही जणांना केली अटक!

**पिंपरी।**
**। महाईन्यूज । प्रतिनिधी।**



पुणे ग्रामीण पोलिसांच्या हद्दीतील पुणे सोलापूर महामार्गावर शुक्रवारी एका चार चाकी वाहनावर गोळीबार करून तब्बल तीन कोटी साठ लाख रुपयांचे रोख रक्कम चोरून नेल्याचा प्रकार उघडकीस आला होता. ग्रामीण पोलिसांनी या प्रकरणाचा छडा लावला असून सहा दरोडेखोरांना बेड्या ठोकले आहेत. या गुन्ह्यात मुख्य आरोपी असलेल्या सहाही जणांना पोलिसांनी 72 तासाच्या आत अटक केली आहे. त्यांनी लुबाडलेली रोख रक्कम ही पोलिसांनी जप्त केली आहे. इंदापूर पोलिसांनी ही कारवाई केली.

सागर होनमाने ज्योतीराम कदम आणि रजत मुलांनी या तिघांना कुर्डूवाडी परिसरातून तर किरण घाडगे भूषण तोंडे आणि गौतम भोसले यांना राजस्थानमधील उदयपूर येथून ताब्यात घेतले आहे. पुणे ग्रामीण पोलिसांनी पत्रकार परिषदेत ही माहिती दिली.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार फिर्यादी भावेश कुमार पटेल यांचा कुरिअरचा व्यवसाय आहे. 26 ऑगस्टच्या रात्री ते नांदेड लातूर आणि सोलापूर येथून पार्सल घेऊन मुंबईला जात होते. यावेळी इंदापूर पोलीस स्टेशनच्या हद्दीत पहाटे सहा जणांनी त्यांची गाडी अडवत गोळीबार केला. गाडीत असणाऱ्या फिर्यादी आणि त्यांच्यासोबत असलेल्या एका व्यक्तीला मारहाण करून खाली उतरण्यास भाग पाडले. त्यानंतर गाडी ठेवलेली 3 कोटी 60 लाख रुपयांची रक्कम चोरून नेली.

दरम्यान इतकी मोठी रक्कम चोरीला गेल्याने एकच खळबळ उडाली होती. पोलीस अधीक्षक अभिनव गुप्ता यांनी तातडीने तपास पथके नेमून तपासाला सुरुवात केली होती.

पोलिसांनी केलेल्या तांत्रिक तपासात आरोपी सागर होनमाने यांनी इतर साथीदारांच्या मदतीने हा गुन्हा केल्याचे निष्पन्न झाले.

**ग्रामीण पोलिसांनी या प्रकरणाचा छडा लावला असून सहा दरोडेखोरांना बेड्या ठोकले आहेत. या गुन्ह्यात मुख्य आरोपी असलेल्या सहाही जणांना पोलिसांनी 72 तासाच्या आत अटक केली आहे. त्यांनी लुबाडलेली रोख रक्कम ही पोलिसांनी जप्त केली आहे. इंदापूर पोलिसांनी ही कारवाई केली.**

त्यानंतर पोलिसांनी सर्च ऑपरेशन राबवत सर्वच्या सर्व आरोपींना अटक केली.

पोलिसांनी आरोपींनी लुटलेल्या रकमेपैकी एक कोटी 43 लाख रुपये जप्त केले आहेत. तर, इतर रक्कम अजूनही जप्त करण्याची बाकी आहे. या प्रकरणात आणखी काही आरोपी असल्याची माहिती आहे. त्यांच्या शोधासाठी वेगवेगळ्या राज्यात पोलिसांची पथके रवाना झाली आहेत.

---

## शहर कार्यकारिणीच्या बैठकीत बुथ सशक्तीकरणाचा संकल्प

# भोसरी विधानसभा भाजपा बुथ संपर्क अभियान संयोजकपदी हनुमंत लांडगे

## भाजपा शहराध्यक्ष व आमदार महेश लांडगे यांच्याहस्ते निवड

**पिंपरी।**
**। महाईन्यूज । प्रतिनिधी।**



भारतीय जनता पार्टीच्या वतीने आगामी महापालिका, विधानसभा आणि लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर बुथ सक्षमीकरण करण्यावर भर दिला जात आहे. भोसरी विधानसभा मतदार संघाच्या बुथ संपर्क अभियानाच्या संयोजकपदी कामगार नेते हनुमंत लांडगे यांची निवड करण्यात आली.

पिंपरी-चिंचव भाजपा शहर कार्यकारिणीची बैठक मंगळवारी मोरवाडी येथील मध्यवर्ती जनसपर्क कार्यालयात झाली. यावेळी हनुमंत लांडगे यांना नियुक्तीपत्र देण्यात आले. याप्रसंगी भाजपा शहराध्यक्ष व आमदार महेश लांडगे, माजी महापौर नितीन काळजे, स्थायी समितीचे माजी सभापती विलास मडिगेरी, शहर सुधारणा समितीचे माजी चेअरमन राजेंद्र लांडगे, उत्तम केंद्ळे, सरचिटणीस विजय फुगे, दिनेश यादव, किसान मोर्चाचे शहराध्यक्ष संतोष तापकिर, निगडी-चिखली मंडलाध्यक्ष महादेव कवितके, भाजपाचे शहर पदाधिकारी ज्ञानेश्वर नागरगोजे, दत्तात्रय गव्हाणे, अर्जुन ठाकरे, संजय पटनी, शिवराज लांडगे, संजय गायकवाड, योगेश लांडगे, सारीकाताई चव्हाण, किसन बावकर, पांडूरंग साने, निखिल बो-हाडे, संजय परळीकर, सुमित शिंगाडे आदी उपस्थित होते.

आमदार लांडगे म्हणाले की, हनुमंत लांडगे यांची भोसरी विधानसभा बुथ संपर्क अभियानच्या संयोजकपदी निवड करण्यात आली आहे. भोसरी विधानसभा क्षेत्रातील ४१८ बुथ सशक्तीकरणाचे कार्य ते जोमाने करतील असा विश्वास आहे.

### हनुमंत लांडगे पक्षाच्या स्थापनेपासून कार्यरत...

हनुमंत लांडगे हे स्थापनेपासून भाजपाचे कार्यकर्ते आहेत. त्यांनी पिंपरी-चिंचवड महापालिका कर्मचारी महासंघाचे उपाध्यक्ष, कार्याध्यक्ष, मुख्य प्रवक्ते पिंपरी-चिंचवड मनपा सेवक पतसंस्थेचे चेअरमन अशी पदे भूषविली आहेत. सध्या ते महाराष्ट्र प्रदेश भारतीय जनता पार्टी, कामगार आघाडीचे प्रदेश सरचिटणीस तथा सोशल मिडिया प्रमुख म्हणून कार्यरत आहेत.

## संपादकीय »

# कल्याणकारी योजनांवरील विश्वास उडेल...

***भारतात आत्महत्यांचे किंवा अपघातांचे आकडे दर वर्षी वाढत असतात. खरे तर, आर्थिक विकासाचे, वाढत्या दरडोई उत्पन्नाचे आणि गरिबीची रेषा पुसट होण्याचे आवाजी दावे पाहिले, तर हे आकडे कमी व्हायला हवेत.***

मानसिक प्रश्नांनी, व्यक्तिगत नैराश्याने आत्महत्या होतातच; पण सर्वाधिक आत्महत्या जगण्याशी लढाई करताना आलेल्या हतबलतेमधून होतात. 'राष्ट्रीय गुन्हे नोंदणी ब्यूरो'चा ताजा अहवाल चाळला, तर आत्महत्यांची वर्गवारी पाहून कुणाचाही 'कल्याणकारी योजनां'वरचा विश्वास उडेल. देशभरात दर वर्षी ज्या आत्महत्या होतात, त्यातील रोजंदारीवर काम करणाऱ्या किंवा कामच न मिळणाऱ्या कामगारांचे प्रमाण २०१४ पासून क्रमाक्रमाने वाढते आहे. याच वर्षी भारतात सत्तांतर होऊन मोदी सरकार सत्तेत आले होते, याचे स्मरण येथे अनुचित ठरू नये. तेव्हापासून गेल्या आठ वर्षांमध्ये एकूण आत्महत्यांचा आकडा तर वाढतो आहेच; पण त्यातील रोजंदारीवरील कामगारांचे प्रमाण सतत वाढते आहे. त्यामुळे, या वाढीचे सारे खापर गेल्या दोन वर्षांतील करोनावर फोडता येणार नाही. हे कामगारांच्या आत्महत्यांचे प्रमाण आता एकूण आकड्यात २५ टक्क्यांच्या पुढे गेले आहे. सन २०२१ मध्ये देशात एक लाख ६४ हजार ३३ आत्महत्या नोंदविल्या गेल्या. यातील ४२ हजार चार जण हे हातावर पोट असणारे कामगार होते. हे प्रमाण २५.६ पडते. कुणीच आत्महत्या करू नये आणि आयुष्याला नकार देऊ नये हे खरे असले, तरी कामगार आत्महत्या करतो; तेव्हा त्याच्या नैराश्याची तीव्रता किती भयंकर असेल, याची कल्पना केलेली बरी. याचे कारण, मुळात कष्ट करून दोन वेळचे पोट भरावे, इतकीच त्याची माफक अपेक्षा असते. त्याला इमले-माड्या उभारायची आकांक्षाच नसते; मात्र तितकीही अपेक्षा पुरी होऊ नये, हे नेमके कुणाचे अपयश आहे आणि ते कसे दूर होणार, यावरही पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी एखाद्या 'मन की बात'मधून प्रकाश टाकायला हरकत नाही. दुर्दैवाची गोष्ट म्हणजे, रोजंदारीवर काम करणाऱ्या श्रमिकांच्या या आत्महत्यांमध्ये शेतमजूरही असतील आणि त्यामुळे हा आकडा वाढला असेल, असे कुणाला वाटेल; पण त्या आत्महत्यांची गणना ही कृषी आधारित अशा वेगळ्या रकान्यात केली आहे. त्याही आत्महत्या वाढतच आहेत. शेतकऱ्यांच्या आत्महत्या हा तीन दशके वाढत्या विक्राळतेने ग्रासणारा दुर्धर आजार बरा होण्याचे चिन्ह नाही. सन २०२१मध्ये शेतकरी, शेतमजूर यांच्या मिळून १० हजार ८३३ आत्महत्या झाल्या.



## आनंदी सकाळ

# सुखदायी झोप

झोप हा दोन अक्षरी शब्द सहजसोपा असला, तरी मानवी जीवनातील त्याचा समतोल बिघडला, की भल्याभल्यांची झोप उडते. मुळात ती मानवी जीवनातील महत्त्वाची गोष्ट. सुखी आणि निरोगी जीवनासाठी पुरेशी झोप गरजेची. ज्याला अंथरुणावर पडताक्षणी सुखाची झोप लागते, तो सर्वांत सुखी, असे म्हटले जाते. अशा माणसांचा शोध घेतल्यास ती कमी आणि उगाच प्रत्येक गोष्टींची चिंता करीत झोप उडालेलीच अधिक दिसतील. हे शारीरिक आणि मानसिक स्वास्थासाठी हानीकारक आहे. सुख ही मानसिक सवय आहे, ती मनाला लावून घेतली, तर सुखाची झोप सहजपणे लागेल. केवळ मनुष्यच नव्हे, तर पशू-पक्षीही झोपत असतात. फक्त त्याचे प्रमाण कमी-अधिक असते. मुंग्यांना अत्यंत कमी मुग्यांना, तर अधिक झोप वटवाघुळांना लागते. ज्यांना गरजेएवढी झोप सहजपणे आणि गोळ्या न घेता लागते, ते सुखी. आपल्या अवतीभोवती अनेक क्षेत्रांतील लोक असतात. त्यामध्ये धनवान, पदाधिकारी, आरोग्यसंपन्न, लोकजंत्री असलेले, मानसन्मान अधिक लाभलेले, वीर, बळ असणारे, पंडित, व्यापारी आणि दिन-दु:खी-पीडितही असतात.

# चित्रपटाला ओहोटी का लागली?




उत्सव आणि सुट्यांचे दिवस ही एके काळी चित्रपट उद्योगांसाठी पर्वणी होती. गणेशोत्सव, दिवाळी, ईद अशा सणांत प्रदर्शित करण्यासाठी चित्रपट खास राखून ठेवले जात. आज हिंदी चित्रपटसृष्टीला झाले तरी काय, असा प्रश्न पडतो आहे; कारण एकही चित्रपट चालताना दिसत नाही. तुलनेने काही दाक्षिणात्य चित्रपट बरा धंदा करीत आहेत. तिथेही परिस्थिती हिंदीच्या तुलनेत बरी, इतकेच. यावर सध्या देशभरातील चित्रपट उद्योगांमध्ये विचारमंथन सुरू आहे. कोव्हिडच्या आधीच बिघडण्यास सुरुवात झालेली परिस्थिती कोव्हिडनंतर वेगाने बदलली, त्यावर गंभीरपणे विचार केला



जात आहे.

अलीकडेच म्हणजे, २६ जुलै २०२२ रोजी तेलगू चित्रपट निर्माता संघाने एक नोटीस जारी करून, एक ऑगस्टपासून चित्रपटांचे शूटिंग बंद ठेवण्याचे आवाहन केले. कारण? कारण करोनानंतर चित्रपटसृष्टीवर झालेल्या परिणामाचा अभ्यास करणे. त्यावर विचार करणे. हे चिंतन करायचे कारण असे, की 'पुष्पा : द रायझिंग', 'आरआरआर', 'केजीएफ चॅप्टर-२' आणि काही प्रमाणात कमल हासनचा 'विक्रम' यां व्यतिरिक्त असंख्य चित्रपटांनी तिकिटबारीवर पार निराशा केली. त्यात मेगा स्टार चिरंजीवी आणि रामचरणचा १४० कोटी रुपये खर्चून केलेला मेगा बजेट 'आचार्य'ही होता. आपला तोटा कमी करण्यासाठी त्यांनी तो लगेच ओटीटी प्लॅटफॉर्मवर आणला. हे पाहून नागा चैतन्यच्या 'थँक यू'ने तेच केले. (अक्षयकुमारचा 'कठपुतळी' थेट ओटीटीवर प्रदर्शित होतो आहे.) तेलगू चित्रपटसृष्टी हादरली. आधीच प्रेक्षकांनी चित्रपटगृहांकडे पाठ फिरवली होती आणि असे मोठे चित्रपट एका महिन्यात ओटीटीवर दिसू लागले, तर पुढे आपली खैर नाही. तिकिटाचे दर, ओटीटीवर येण्याआधीचा मधला काळ, मल्टीप्लेक्समध्ये खाण्यापिण्याचे दर या सगळ्यांचा विचार करणे भाग होते. स्टार झालेल्या कलाकार व तंत्रज्ञांनी आपले मोबदले वाढवले होते; त्यामुळे चित्रपट निर्मितीचे बजेट वाढले. आंध्र बॉक्स ऑफिसच्या आकडेवारीनुसार, चित्रपटाचे सत्तर टक्के बजेट स्टारच्या मानधनात जाते. करोनाकाळात लोकांना ओटीटीवर चित्रपट, वेबसीरीज बघायची सवय लागली आहे. प्रेक्षकांचा 'अटेन्शन स्पॅन', म्हणजे लक्षकाळ कमी झाला आहे. प्रेक्षक त्यांना वेळ मिळेल तेव्हा थांबून थांबून, तुकड्या तुकड्यांत चित्रपट व वेबमालिका पाहतात. त्यातील एखादे दृश्य आवडल्यास ते लगेच पुन्हा बघतात. बाहेर जाऊन सलग दोन-तीन तास एकाच ठिकाणी बसून चित्रपट पाहणे आता त्यांना गैरसोयीचे वाटते. त्यात वाढलेली महागाई आणि बेरोजगारी. करोनाच्या साथीचा फटका बसलेले अनेक व्यवसाय नंतर सुरूच झाले नाहीत.

# कुपोषण : प्रश्न आणि उत्तर

कुपोषण, माता-बाल मृत्यू हे मुद्दे नवे नाहीत. त्याविषयी अनेकदा चर्चा होत असते. आदिवासी भागातील कुपोषण आणि माता-बाल मृत्यू या प्रश्नांवर मार्ग काढण्यासाठी काही लगेच करण्याचे आणि काही दीर्घकालीन उपाय हवेत.

त्यासाठी सर्वसमावेशक उपचार प्रणाली आणि योजनांचे एकत्रिकरण हवे. हे जेवढ्या लवकर आणि प्रभावीपणे होईल, तितक्या लवकर या प्रश्नावर मार्ग निघेल. कालांतराने हे प्रश्न सतावणार नाहीत.

आपले मूल जगलेच पाहिजे, या निर्धाराने बालकाच्या आई-वडिलांनी उभे राहिले पाहिजे, आदिवासी पालकांना पावसात काम मिळाले पाहिजे, सरकारच्या खावटीवर अवलंबून राहावे लागता कामा नये. आज केंद्र व राज्य सरकारच्या अनेक योजना आहेत. आरोग्य खाते, महिला व बालविकास, आदिवासी विभाग, ग्रामविकास, अन्न, नागरी पुरवठा, रोजगार हमी, सामाजिक न्याय यांच्या योजना एकत्रितपणे राबवल्या, 'कन्व्हर्जन ऑफ स्कीम' केले, तर निश्चित कुपोषण कमी होईल. अर्भक मृत्यू, बाल मृत्यू कमी होतील. वाडा, मोखाडा, खोडाळा, डोळखांब, शहापूर, पेठ सुरगणा, अक्कल कुवा, धडगाव, मेळघाट, अकोले या भागातील कुपोषण भौगोलिक रचनेनुसार आहे. सह्याद्रीच्या पाड्यावरची राहणी वेगळी, चालीरिती, रूढी वेगळ्या. सातपुडा जंगलातील वेगळ्या, तर थंड हवेचे ठिकाण असलेल्या चिखलदरा, धारणी येथील राहणीमान वेगळे. गडचिरोलीचा भाग वेगळा. कोरकू, भिल्ल, वारली, गोंड, कातकरी असे वेगवेगळ्या जमातीचे लोक राहतात. लवकर लग्न आणि लवकर गर्भधारणा हे कारण आहेच. अनेक वर्षांपासून चालत आलेल्या चालीरीती आजही कायम आहेत. या लोकांचा एकलकोंडा स्वभाव, सरकार-पोलिस यांपासून भीती; त्यामुळे जंगलात राहणे मुख्य रस्त्यापासून दूर पाड्यावर राहणे, वेगवेगळ्या वस्ती करून राहिल्याने सोयी-सुविधांपासून ते वंचित आहेत. रस्ता नसल्याने शिक्षण, आरोग्य यांपासून त्यांना वंचित राहावे लागते. पालघरमधील चाळिसाहून अधिक पाड्यांना रस्ता नाही; त्यामुळे रुग्ण, गरोदर स्त्रियांना डोलीतून आणावे लागते. तीच परिस्थिती मेळघाट व इतरत्र आहे. यातूनच माता मृत्यू, बाल मृत्यू होतात.

या गावांतील, पाड्यांवरील लोकांना डॉक्टरांपेक्षा भूमका, मांत्रिक, भगत, पडियार, वैदू जवळचा वाटतो. संपूर्ण गाव भूमका किंवा मांत्रिकाला घाबरतो. अनेकदा आशा वर्कर, डॉक्टर त्यांच्या धमकावणीला बळी पडतात, ही वस्तुस्थिती आहे; त्यामुळेच मग रुग्णालयांत होणाऱ्या प्रसूतींची संख्या कमी होते आणि जन्म-मृत्यू (स्टिल बर्थ) दरही वाढतो. माता दगावतात. मेळघाटमध्ये भूमका, मोखाड्यातील भगत, मांत्रिक यांनी आदिवासी समाजाला आजही जखडून टाकले आहे. या अंधश्रद्धेच्या बंधनातून हा समाज बाहेर पडेल, तेव्हाच बाल मृत्यू थांबतील. त्यासाठी आदिवासी समाजाला मुख्य प्रवाहात आणणे गरजेचे आहे. आदिवासी आश्रमशाळांतून मुले शिकली पाहिजेत. कुटुंब सक्षम करण्यासाठी मुलींचे शिक्षण होणे आवश्यक आहे. वयात आल्यानंतर फार थोड्या मुली शिक्षणाच्या प्रवाहात राहतात; त्यामुळे लवकर लग्न केली जातात. मग पुन्हा एकदा वजन कमी, वय कमी, हिमोग्लोबिन कमी, गर्भधारणा झाल्यानंतर गर्भाची वाढ होत नाही. हे टाळण्यासाठी प्रत्येक महिलेची ए.एन. सी. (अँटिनेटल केअर) तपासणी व्हावी.

## ।। अभंगवाणी ।।




करावी ते पूजा मनें चि उत्तम ।
लौकिकाचें काम काय असे ॥१॥
कळावें तयासि कळे अंतरींचें ।
कारण तें साचें साचा अंगीं ॥ध्रु.॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी गाळा क्रमांक 79-80 छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, संत तुकाराम नगर, अग्निशमन केंद्रासमोर, पिंपरी, पुणे - 411018. **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक ः *सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक ः MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

## शॉर्ट न्यूज

### राज्यात शिक्षकांची 31 हजार 472 पदे रिक्त



। मुंबई । महाईन्यूज ।

राज्यातील 31 हजार 472 शिक्षकांची पदे रिक्त आहेत. राज्यात जिल्हा परिषद, महानगरपालिका, नगरपरिषद शाळा आणि छावणी शाळांमध्ये मिळून तब्बल 31 हजार 472 पदे रिक्त आहेत. तसेच राज्यातील स्थानिक स्वराज्य शाळांमध्ये एकूण मंजूर पदे 2 लाख 45 हजार 591 आहेत. यामध्ये कार्यरत पदे 2 लाख 14 हजार 119 आहेत, तर एकूण रिक्त पदांची संख्या तब्बल 31 हजार 472 आहे. मिळालेल्या माहितीनुसार, जिल्हा परिषद शाळांमध्ये मंजूर पदे 2 लाख 19 हजार 428 आहेत. त्यापैकी 1 लाख 99 हजार 976 पदे कार्यरत आहेत. तर तब्बल 19 हजार 452 पदे रिक्त आहेत. महानगरपालिकांच्या शाळांमध्ये मंजूर पदांची संख्या 19 हजार 960 असून त्यापैकी 8 हजार 862 पदे कार्यरत आहेत. मनपा शाळांमध्ये 11 हजार 98 पदे रिक्त आहेत.

# शिंदेसोबत जाताना बाप्पाच काय सर्व देव आठवले : गुलाबराव पाटील !

## आम्ही सहकाऱ्यांनी एकमेकांना गोळ्या घातल्या नाहीत



मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

"मी शिंदे गटात सहभागी होताना जो निर्णय घेतला, त्यावेळी क्षणोक्षणी गणपती बाप्पाच नव्हे, तर अक्षरशः सर्व देव आठवत होते, अशी कबुलीच पाणीपुरवठा मंत्री गुलाबराव पाटील यांनी दिली.

विशेषतः आज ते आणि जुने सहकारी एकत्र आले. त्यावरही त्यांनी आम्ही काय एकमेकांना गोळ्या घातल्या नाही असे सूचक वक्तव्यही केले. शिवसेनेने मला मोठे केले असे म्हणणारे गुलाबराव पाटील हे पक्षप्रमुख उद्धव ठाकरेंची साथ सोडून शिंदे गटात सहभागी झाले. त्यावेळची स्थिती आणि मनस्थिती त्यांनी गणरायाचे आगमन झाल्यानंतर व्यक्त केली.

गुलाबराव पाटील म्हणाले, राज ठाकरे, उद्धव ठाकरे आज वेगळे आहेत पण ते एकमेकांच्या दुःखात जात नाहीत असे नाही. आम्ही आज एकत्र आलो यात नवल नाही. आम्ही एकमेकांना गोळ्या घातलेल्या नाहीत.

### गणरायाची स्थापना

अखंड परंपरेनुसार मंत्री गुलाबराव पाटील यांच्याघरी गणेशोत्सव साजरा केला जातो. मोठ्या भक्ती भावाने मंत्री पाटील यांच्या घरी दहा दिवस बाप्पांची स्थापना केली जाते. यंदाही त्यांच्या घरी भक्तिपूर्ण वातावरणात मंत्री गुलाबराव पाटील यांनी सपत्नीक गणरायाची स्थापना केली. यावेळी मंत्री गुलाबराव पाटील यांचे चिरंजीव प्रतापराव पाटील यांच्यासह सर्व कुटुंबीय उपस्थित होते.

### तेव्हा बाप्पाच आठवतात...

गुलाबराव पाटील म्हणाले, राजकारणच नव्हे तर कुठल्याही क्षेत्रात संकटे ही येत असतात. त्यावेळी आपल्याला गणपती बाप्पाची आठवण येते. आम्ही ज्यावेळेस शिंदे गटात सहभागी झालो होतो त्यावेळी सर्वच देव आठवले होते. देवाच्या आशीर्वादाने आजपर्यंत यश मला मिळाले आहे. यापुढेही देव नेहमी असेच पाठीशी उभे राहतील, अशी माझी गणरायाकडे प्रार्थना आहे.

### भांडणावेळी भांडण...

गुलाबराव पाटील म्हणाले, राजकारणात भांडणावेळी भांडण करायचे, पण त्यासाठी वैयक्तिक संबंध खराब करण्यात अर्थ नाही. जूने सहकारी आज एकत्र आले, राजकारणात हे चालतेच, प्रारब्धाशिवाय काहीच नसते. नशिबाला माणसाने ठोकायचे असते.

# राज्यात 1 हजार 600 नवे रुग्ण; तर 1,864 रुग्ण कोरोनामुक्त




मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

मुंबईसह राज्यभरातील कोरोनाच्या रुग्णांच्या आकडेवारीत चढ-उतार होत आहेत. वाढत्या रुग्णांच्या पार्श्वभूमीवर लसीकरण मोठ्या प्रमाणात केले जात आहे. लसीकरण हे कोरोनावरील जालीम उपाय मानले जात आहे. त्यामुळे लस घेण्याचे आवाहन महापालिका प्रशासन व सरकारकडून केले जात आहे. अशातच आज राज्यात 1 हजार 600 कोरोनाच्या नव्या रुग्णांची भर पडली आहे. तसेच, दिवसभरात एकूण 1 हजार 864 रुग्ण कोरोनामुक्त होऊन घरी परतले आहेत. गेल्या 24 तासांत राज्यात 5 कोरोना बाधित रुग्णाच्या मृत्यूची नोंद झाली आहे. त्यामुळे राज्यातील मृत्यूदर हा 1.83 टक्के इतका झाला. तर आतापर्यंत राज्यामध्ये 79 लाख 41 हजार 458 कोरोनाबाधित बरे होऊन घरी परतले आहेत. त्यामुळे कोरोना रुग्ण बरे होण्याचं प्रमाण 98.04 टक्के इतके झाले आहे. राज्यात एकूण 10 हजार 633 सक्रिय रुग्ण संख्या आहे. त्यामध्ये मुंबईत सर्वाधिक म्हणजे 4 हजार 257 इतके रुग्ण असून, त्यानंतर ठाण्यामध्ये 2 हजार 380 सक्रिय रुग्ण आहेत. मुंबईत आज 638 नव्या कोरोना रुग्णांची नोंद झाली आहे. मुंबईत मंगळवारी 769 रुग्णांनी कोरोनावर मात केली आहे. त्यामुळे मुंबईत कोरोनावर मात केलेल्या रुग्णांची संख्या 11 लाख 20 हजार 868 वर पोहोचली आहे. त्यामुळे मुंबईचा रिकव्हरी रेट 97.9 टक्के इतका झाला आहे.

# पाऊस लांबल्याने पिके धोक्यात!

## मागील 15 ते 20 दिवसांपासून पाऊस गायब, बळिराजाची चिंता वाढली

दुधड : । महाईन्यूज । प्रतिनिधी।



औरंगाबाद तालुक्यामध्ये यावर्षीच्या खरीप हंगामात ९० टक्के पेरणी झाली असून सध्या कपाशीचे पीक फुलोऱ्यात आले आहे. तर सोयाबीनला देखील शेंगा लगडल्या असून दाणे भरण्याचा काळ आहे. परंतु मागील पंधरा ते वीस दिवसांपासून पाऊस गायब झाल्यामुळे सुमारे येथील ६५ हजार ८५५ हेक्टरवरील पिके सुकू लागली असून यामुळे बळिराजाच्या चिंता वाढली आहे.

तालुक्यामध्ये कापूस, तूर, सोयाबीन, बाजरी, मका, मुग, उडीद, तीळ यासह इत्यादी पिकांची ६५ हजार ८५५ हेक्टरवर खरीप हंगामात पेरणी झाली आहे. उशिराने पेरणी झाल्यामुळे मुग, उडीद, तीळ, मका, बाजरी या पिकांची अत्यल्प प्रमाणात पेरणी झालेली असून प्रथम क्रमांकावर कापूस तर दुसऱ्या स्थानी तूर, तिसऱ्या स्थानी सोयाबिन पेरणी झालेली आहे. सोयाबीन, तूर, कपाशीला मिळालेला जास्तीचा भावामुळे शेतकऱ्यांनी यंदा जास्त पेरणी केली.

हंगामाच्या सुरुवातीपासूनच रिमझीम पाऊस होत असून अद्यापही जोरदार पाऊस झालेला नाही. रिमझीम पावसावरच पिके बहरलेली आहेत. परंतु मागील वीस दिवसांपासून पाऊस गायब झाला आहे. त्यामुळे कपाशी आणि सोयाबीन पिकाचे भविष्य धोक्यात आले आहे. कपाशीला बोंडे लागत आहेत तर सोयाबीनला शेंगा लगडल्या आहेत. या महत्त्वाच्या काळात पिकांना पाणी मिळत नसल्यामुळे उत्पन्नावर परिणाम होणार आहे. त्यामुळे शेतकरी राजा जोरदार पावसाच्या प्रतीक्षेत आहे. खरीप हंगामात कापसाची ३९ हजार ८१८ तर सोयाबिन ५ हजार हेक्टरवर पेरणी करण्यात आली आहे.

> **पाऊस लांबल्याने पिकांना ताण सहन करण्यासाठी १३:००:४५ या विद्राव्य खताचे १०० ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यात घेऊन फवारावे. हलकी अंतर मशागत करावी. जेणेकरून जमिनीतून केस आकर्षणद्वारे होणारा ओलाव्याचा ऱ्हास कमी होईल. -हर्षदा जगताप (तालुका कृषी अधिकारी)**

> **यंदाच्या खरिपात उशिराने पेरणी झाली. हंगामाच्या सुरुवातीला झालेल्या पावसानंतर अद्यापही मोठा पाऊस झालेला नाही. रिपरिप पावसामुळे पिके चांगली होती. परंतु वीस दिवसांपासून गायब झालेल्या पावसामुळे पिके सुकू लागली. -शिवाजी वाघ (शेतकरी शेकटा)**

# "'लाव रे तो व्हिडीओ'वाले राज ठाकरे खरे होते, आता मात्र...", काँग्रेसची टीका



मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

काँग्रेसचे विधीमंडळ नेते आणि आमदार बाळासाहेब थोरात यांनी मनसे प्रमुख राज ठाकरे यांच्या बदलत्या भूमिकांवरून खोचक टोला लगावला आहे. "आम्ही पूर्वी 'लाव रे तो व्हिडीओ'वाले जे राज ठाकरे पाहिले ते खरे राज ठाकरे होते. आता मात्र ते वेगळ्या दिशेने चाललेले दिसत आहेत," असं मत बाळासाहेब थोरात यांनी व्यक्त केलं. ते बुधवारी (३१ ऑगस्ट) नवी मुंबईत पत्रकारांशी बोलत होते.

बाळासाहेब थोरात म्हणाले, "राज ठाकरे यांची वाटचाल कशी चालली आहे हे आपण पाहत आलो आहोत. आम्ही पूर्वी 'लाव रे तो व्हिडीओ'वाले जे राज ठाकरे पाहिले ते खरे राज ठाकरे होते. आता मात्र ते वेगळ्या दिशेने चाललेले दिसत आहेत."

# उद्धव ठाकरे-शिंदे गट परस्परांमधील कुरघोड्या सुरूच!

## शिवसेना आमदाराचं शिंदे गटावर टीकास्त्र!

**मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।**

राज्यात शिवसेना आणि भाजपा यांची फारकत झाल्यानंतर या दोन्ही पक्षांनी एकमेकांवर टीका करण्याची एकही संधी सोडली नाही. मात्र, आता खुद्द शिवसेनेतच फूट पडून शिंदे गट बाजूला झाल्यानंतर या दोन्ही बाजूंकडून एकमेकांवर कुरघोडीचं राजकारण सुरू झालं आहे. शिंदे गटातील आमदारांचा उल्लेख शिवसेनेकडून गद्दार असा केला जात असताना शिंदे गटाकडून देखील उद्धव ठाकरे आणि शिवसेनेला लक्ष्य केलं जात आहे. आज राज्यभरात गणेशोत्सवाचा उत्साह असताना नेतेमंडळींनी याचं निमित्त साधून टोलेबाजी केली आहे. शिवसेना आमदार आणि विधानपरिषद विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी त्यांच्या घरी बाप्पांची प्राणप्रतिष्ठा केल्यानंतर माध्यमांशी बोलताना शिंदे गटावर टीकास्त्र सोडलं.



**शिवसेनेतच फूट पडून शिंदे गट बाजूला झाल्यानंतर या दोन्ही बाजूंकडून एकमेकांवर कुरघोडीचं राजकारण सुरू झालं आहे. शिंदे गटातील आमदारांचा उल्लेख शिवसेनेकडून गद्दार असा केला जात असताना शिंदे गटाकडून देखील उद्धव ठाकरे आणि शिवसेनेला लक्ष्य केलं जात आहे. आज राज्यभरात गणेशोत्सवाचा उत्साह असताना नेतेमंडळींनी याचं निमित्त साधून टोलेबाजी केली आहे**

### "काही लोकांच्या मनात दुर्बुद्धी आल्याने..."

**"न्यायालयाच्या निकालाविषयी मी बोलणं संयुक्तिक राहणार नाही. काल-परवा एक नेते त्यावर बोलले आहेत. पण नक्कीच आम्हाला न्यायाची अपेक्षा आहे", असं अंबादास दानवे यावेळी म्हणाले. "उद्धव ठाकरेंसारखं एक सालस आणि सर्वांना सोबत घेऊन चालणारं नेतृत्व राज्याला लाभलं होतं. काही लोकांच्या मनात दुर्बुद्धी आल्यामुळे बाजूला सारलं गेलंय", असा टोला दानवेंनी यावेळी लगावला.**

### "येत्या काळात हिंदुत्वाचा झंझावात..."

**"उद्धव ठाकरेंसमोर मुख्यमंत्रीपदाची खुर्ची म्हणजे छोटी खुर्ची आहे. उद्धव ठाकरेंचं नेतृत्व फक्त महाराष्ट्र नाही, तर देशाच्या वेगवेगळ्या विषयांना स्पर्श करणारं नेतृत्व आहे. त्यामुळे येत्या काळात त्यांच्याच नेतृत्वाखाली पुन्हा एकदा महाराष्ट्रात आणि देशातही हिंदुत्वाचा झंझावात येऊ दे अशी प्रार्थना मी गणरायाला केली आहे", असं देखील अंबादास दानवे यावेळी म्हणाले.**

अंबादास दानवेंनी आज त्यांच्याघरी सहकुटुंब गणरायाची प्राणप्रतिष्ठा केली. यानंतर माध्यमांनी गणरायाला काय साकडं घातलं? यासंदर्भात विचारणा केली असता त्यांनी शिंदे गटावर टीकास्त्र सोडलं. तसेच, पुन्हा महाराष्ट्रात उद्धव ठाकरेंच्या नेतृत्वात हिंदुत्वाचा झंझावात यावा, अशी अपेक्षा देखील व्यक्त केली.

# राजकारणात दिसतं तस नसतं

## काँग्रेस अध्यक्षपदासंदर्भात पायलट यांचं सूचक विधान

**जयपूर । महाईन्यूज । प्रतिनिधी।**



राजस्थानचे माजी उपमुख्यमंत्री आणि काँग्रेस नेते सचिन पायलट यांनी बुधवारी काँग्रेसच्या पक्षाध्यक्ष पदाबाबतच्या शक्यतांवर मोठं विधान केलं आहे."राजकारणात जे दिसते ते घडत नाही आणि पक्षाध्यक्ष कोण होईल हे ऑक्टोबरमध्ये स्पष्ट होईल, असंही सचिन पायलट यांनी म्हटलं. त्यामुळे सचिन पायलट अध्यक्षपदाच्या शर्यतीत असल्याची चर्चा सुरू झाली आहे.


गुलाम नबी आझाद यांच्यासह अनेक नेत्यांनी काँग्रेस सोडल्याच्या प्रश्नावर ते म्हणाले की, या लोकांचा निर्णय योग्य की अयोग्य हे जनता आणि काळ ठरवेल. पत्रकारांशी संवाद साधताना पायलट यांना काँग्रेस अध्यक्षपदाच्या निवडणुकीबाबत सुरू असलेल्या अटकळींबाबत विचारले असता ते म्हणाले, कोणीतरी म्हटलच आहे, 'राजकारणात जे दिसतं ते घडत नाही, जे घडते ते दिसत नाही. त्यामुळे थोडं थांबा सर्वकाही बाहेर येईलच. पक्षात मी असो असो वा अन्य कोणी पक्षादेश सर्वांसाठी महत्त्वपूर्णच आहे.

आझाद आणि इतर नेत्यांनी पक्ष सोडला त्यावर पायलट म्हणाले की, "भाजप आणि केंद्र सरकारच्या विरोधात सुरू असलेल्या लढाईत खांद्याला खांदा लावून उभं राहण्याची वेळ होते. मात्र कुठेतरी या नेत्यांनी त्यांच्या जबाबदारीपासून पळ काढला. ज्यांना पक्षाने खूप काही दिलं त्यांच्यासाठी आज पक्षाला परत देण्याची वेळ आली आहे, असे खुद्द सोनिया गांधी यांनी म्हटले आहे. मात्र नेत्यांनी तस करण्याऐवजी पक्ष सोडला. तरी त्यांचा निर्णय किती चुकीचा आणि कितपत योग्य होता हे जनता आणि काळ ठरवेल, असंही पायलट यांनी नमूद केलं.

# पाकिस्तानला पुराचा फटका

## 3 हजार किमीचा रस्ता गेला वाहून

**। वर्धा । महाईन्यूज । विशेष प्रतिनिधी ।**



मुसळधार पावसामुळे पाकिस्तानात मोठ्या प्रमाणात पूरस्थिती निर्माण झाली आहे. पूरस्थिती निर्माण झाल्याने मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. आतापर्यंत या पूरामुळे सुमारे 1100 लोकांचा मृत्यू झाला आहे. तसेच, 10 लाखांहून अधिक नागरिक बेघर झाले असून, पायाभूत सुविधांचेही सर्वाधिक नुकसान झाले आहे. मिळालेल्या माहितीनुसार, सुमारे 3 हजार किमीचा रस्ता वाहून गेला आहे. अनेक पूल आणि बंधारेही तुटल्याचे समजते.

पाकिस्तानी प्रसारमाध्यमांनी दिलेल्या माहितीनुसार, सध्या सुमारे 30 दशलक्ष लोक पुरामुळे प्रभावित झाले आहेत. हवामान खात्याच्या म्हणण्यानुसार पावसाने येथील 30 वर्षांचे सर्व विक्रम मोडीत काढले आहेत. पावसामुळे केवळ जीवितहानीच नाही तर पाकिस्तानचेही कोट्यवधी रुपयांचे नुकसान झाले आहे. पाकिस्तानातील 110 जिल्हे पुराच्या तडाख्यात आहेत. सरकारने यातील 72 जिल्हे आपत्तीग्रस्त म्हणून घोषित केले असून, सर्वात वाईट परिस्थिती सिंध, कराची, पंजाब, खैबर पख्तूनख्वा, बलुचिस्तान प्रांतात आहे. सिंधमधील 23 जिल्हे पुराच्या विळख्यात असून सुमारे 1.45 कोटी लोकांना त्याचा फटका बसला आहे. बलुचिस्तानमधील 34 जिल्हेही या आपत्तीत बुडाले आहेत. येथील 91 लाखांहून अधिक लोकांना पुराचा फटका बसला आहे. यानंतर खैबर पख्तूनख्वामधील ३३ जिल्हे पुराच्या विळख्यात आहेत.

# कर्नाटकात अतिवृष्टी; पुरामुळे 27 जिल्हे आणि 187 गावे बाधित!

### पूरस्थितीमुळे कर्नाटकातील रस्ते जलमय, वाहतुकीवर मोठ्या प्रमाणात परिणाम

**कर्नाटक। महाईन्यूज । प्रतिनिधी।**

देशभरातील अनेक भागांत गेल्या काही दिवसांपासून मुसळधार पावसाने हजेरी लावली आहे. पावसामुळे पूरस्थिती निर्माण झाली असून, जनजीवन विस्कळीत झाले आहे. या अतिवृष्टीमुळे 27 जिल्हे आणि 187 गावे बाधित झाली आहेत. पूरस्थितीमुळे कर्नाटकातील रस्ते जलमय झाले असून, वाहतुकीवर मोठ्या प्रमाणात परिणाम झाले आहे. तसेच, राजधानी बंगळुरुमध्ये पावसाचा सर्वाधिक परिणाम झाल्याचे दिसून येत आहे.



**अतिवृष्टीमुळे 27 जिल्हे आणि 187 गावे बाधित झाली आहेत. पूरस्थितीमुळे कर्नाटकातील रस्ते जलमय झाले असून, वाहतुकीवर मोठ्या प्रमाणात परिणाम झाले आहे. तसेच, राजधानी बंगळुरुमध्ये पावसाचा सर्वाधिक परिणाम झाल्याचे दिसून येत आहे.**

कर्नाटकात पावसाची संततधार गेल्या अनेक दिवसांपासून सुरू आहे. मुसळधार पावसामुळे रस्ते जलमय झाले असल्यामुळे अनेक भागात अडकलेल्या लोकांना बाहेर काढण्यासाठी बोटींचा वापर केला जात आहे. त्याशिवाय, पावसाच्या घटनांमुळे राज्यात एकूण 23 हजार 794 घरांचे नुकसान झाले आहे. तर शेती पिकांचे देखील पावसामुळे मोठे नुकसान झाले आहे. पावसामुळे आत्तापर्यंत 5.8 लाख हेक्टर क्षेत्रावरील पिकांचे नुकसान झाल्याची माहिती मिळते. या नुकसानीबाबत केंद्र सरकारकडे मदतीची मागणी केल्याची माहिती मंत्री अशोक यांनी दिली आहे. मात्र, केंद्राच्या मदतीची वाट न पाहता मुख्यमंत्र्यांनी तातडीने मदत देण्याच्या सूचना दिल्या असल्याचे मंत्री अशोक म्हणाले. कर्नाटकचे मुख्यमंत्री बसवराज बोम्मई यांनी रामनगरासह पूरस्थितीमुळए बाधित झालेल्या परिसराला भेट दिली. या भेटीत मुख्यमंत्र्यांनी पूरग्रस्त नागरिकांच्या तक्रारी ऐकून घेतल्या. तसेच लोकांना मदतीचे आश्वासन दिले आहे.

# ‘हे तर आठवं आश्चर्य’! समंथाच्या नव्या चित्रपटावर चाहत्यांच्या भन्नाट प्रतिक्रिया

दाक्षिणात्य अभिनेत्री समंथा ही अनेक लोकप्रिय अभिनेत्रींपैकी एक आहे. ‘पुष्पा चित्रपटातील गाण्याने समंथाच्या लोकप्रियतेत अधिकच वाढ झाली. अशातच आता समंथाने तिच्या पुढील चित्रपटाचा टीझर लाँच करण्याची घोषणा केली आहे. समंथाचा पुढील चित्रपट यशोदा आहे आणि त्याचा टीझर 9 सप्टेंबर 2022 रोजी प्रदर्शित होणार आहे. हरी-हरीश ही दिग्दर्शक जोडी समंथाचा ‘यशोदा' चित्रपट बनवत आहे. यामध्ये प्रसिद्ध कलाकार वरलक्ष्मी सरथकुमार, उन्नी मुकुंदन, राव रमेश, मुरली



शर्मा आणि संपत राज यांच्या महत्त्वाच्या भूमिका आहेत. या घोषणेपासून समंथाच्या चाहत्यांनाकडून मोठ्या प्रमाणावर प्रतिक्रिया येत आहेत. समंथाचा ‘यशोदा'चित्रपट एकाच वेळी तेलुगू, तमिळ, हिंदी, कन्नड, मल्याळम या भाषांमध्ये प्रदर्शित करण्यात येणार आहे. हा एक सस्पेन्स थ्रिलर आहे. चित्रपटाचे पोस्टर रिलीज झाल्यानंतर चाहते प्रतिक्रिया देत आहेत. एका चाहत्याने लिहिले आहे की, ‘मी जगातील सात आश्चर्यांबद्दल ऐकले होते आणि आठवे पाहिले.’ एका चाहत्याने लिहिले आहे की, ती गर्दीतही वेगळ्या नजरेने दिसते. काही जण तिचा लूक आवडला असंही म्हणत आहेत तर काही जण तिला फॅब्युलस म्हणत आहेत. अशा प्रकारे, समंथाच्या लूकचे खूप कौतुक केले जात आहे. चित्रपटाचे निर्माते शिवलेंका कृष्णा प्रसाद म्हणाले, ‘समंथाने ‘फॅमिली मॅन 2’ वेब सीरिजद्वारे संपूर्ण भारतातील प्रेक्षकांना आकर्षित केले. त्यांचा आवाका लक्षात घेऊन आम्ही कोणतीही तडजोड न करता हा प्रकल्प उभा करत आहोत. समंथाचं काम पाहून मला तिचा अभिमान वाटतो. समंथाचा नवा चित्रपट पाहण्यासाठी चाहते सुद्धा उत्सुक आहेत.

# बॉलिवूड सेलिब्रिटींच्या घरच्या बाप्पाची आराससुद्धा खास, पाहा झलक!

आज गणेश चतुर्थीच्या दिवशी आपल्या लाडक्या बाप्पाचं आगमन प्रत्येकाच्या घरी झालं आहे. बाप्पाच्या आगमनाने सर्वत्रच भक्तिमय वातावरण झाले आहे. यावर्षी 31 ऑगस्ट 2022 ते 9 सप्टेंबर 2022 कालावधीत गणेशोत्सव साजरा केला जात आहे. गणेशोत्सव हा सण मुंबईसह भारतातील महत्वाच्या सणांपैकी एक आहे. गणपतीचे सर्वच भक्त हा सण खूप आनंदात आणि उत्साहात साजरा करतात. बाप्पाची मूर्ती, नैवेद्य आणि आरास या सगळ्याचीच तयारी आपण सगळे करत असतो. अशातच



बॉलिवूड सेलिब्रिटींच्या घरच्या बाप्पाची सजावट, आरास सुद्धा खुप खास आहे. त्याचीच खास झलक पाहू. बॉलीवूड सेलिब्रिटी सुद्धा गणेशोत्सव साजरा करण्यासाठी आणि तो ही पर्यावरणपूरक पद्धतीने साजरा करत आहेत. अभिनेत्री शिल्पा शेट्टी आणि अनन्या पांडेपासून हृतिक रोशनपर्यंत बॉलिवूड कलाकारांनी बाप्पाची सजावट पर्यावरण पूरक पध्दतीने केली आहे. त्याचीच ही खास झलक.



# सर्वोच्च न्यायालयाकडून अमिषा पटेलला दिलासा, कोट्यावधींची फसवणुकीचा होता आरोप

अभिनेत्री अमिषा पटेलला सर्वोच्च न्यायालयाने मोठा दिलासा दिला आहे. अमिषावर फसवणूक आणि विश्वासघात केल्याचा आरोप आहे. झारखंडमधील कनिष्ठ न्यायालयाने या प्रकरणी समन्स बजावले होते. आता सर्वोच्च न्यायालयाने अमिषा पटेल) विरुद्धच्या फौजदारी कारवाईला स्थगिती दिली आहे. अभिनेत्रीने ५ मे २०२२ रोजी याचिका दाखल केली होती, ज्यावर सर्वोच्च न्यायालयात सुनावणी झाली. न्यायमूर्ती बी.आर. गवई आणि पी.एस. नरसिंहा यांच्या पीठाने झारखंड सरकारला नोटीस बजावली आहे. निगोशिएबल इन्स्ट्रुमेंट्स कायद्याच्या कलम १३८ (चेक बाऊन्स) अंतर्गत कारवाई कायद्यानुसारच केली जावी, असेही सर्वोच्च न्यायालयाने आपल्या सुनावणीत म्हटले आहे. भारतीय दंड संहिता, १८६० च्या कलम ४०६ (गुन्हेगारी भंग) आणि ४२० (फसवणूक) अंतर्गत केवळ नोटीस जारी करा, असे न्यायालयाने म्हटले.

# राडा चित्रपटाचा धमाकेदार टिझर प्रेक्षकांच्या भेटीला

सध्या सोशल मीडियावर राडा चित्रपटाची चर्चा सुरू आहे. फुल्ल ऑफ ॲक्शन, कॉमेडी आणि सोबत रोमँटिक सीन्स असलेला ‘राडा'(RADA MARATHI MOVIE) सिनेमाच्या मोशन पोस्टरने सोशल मीडियावर चांगलीच हवा केलीय. क्षणाचा विलंब न करता या सिनेमाचा टिझर प्रेक्षकांच्या भेटीस येण्यास सज्ज झाला आहे. थरारक दृश्ये, ॲक्शन सीन्स आणि लव्हस्टोरी असलेल्या या टिझरने चित्रपटाबाबतची उत्सुकता आणखीनच वाढली आहे. चित्रपटाचा टिझर पाहता साऊथ स्टाईलची कमतरता कुठेही भासत नाही आहे. तर कलाकारांच्याही यांत दमदार भूमिका असणार आहेत, हे टिझरमधून प्रेक्षकांच्या भेटीस आले आहे. राम शेट्टी निर्मित ‘राडा’ या सिनेमाचा हिरो समा म्हणजेच अभिनेता आकाश शेट्टी तुफ्तेवार ‘राडा’ या सिनेमातून सिनेविश्वात पदार्पण करत आहे. तर राम शेट्टी निर्मित, रमेश व्ही. पारसेवार आणि सुप्रिम गोल्ड प्रस्तुत, सूरज फिल्म अँड एंटरटेनमेंट बॅनरचा आणि सहनिर्माता वैशाली पेद्दावार व पॅड कॉर्प – पडगीलवार कॉर्पोरेशन यांच्या या चित्रपटात आकाश शेट्टीसह मिलिंद गुणाजी, संजय खापरे, गणेश यादव, अजय राठोड, गणेश आचार्य(GANESH ACHARY), निशिगंधा




वाड, योगिता चव्हाण, सिया पाटील, हिना पांचाळ(HEENA PANCHAL), शिल्पा ठाकरे या कलाकारांना पाहणे रंजक ठरणार आहे. राडा चित्रपट 23 सप्टेंबरला प्रेक्षकांच्या भेटीला येत आहे. दिग्दर्शक रितेश सोपानराव नरवाडे यांनी चित्रपटाचे दिग्दर्शन, संवाद आणि स्क्रीनप्ले अशा तीनही धुरा पेलवल्या आहेत. तर चित्रपटाच्या संगीताची जबाबदारी दिनेश अर्जुना व एका गाण्याची धुरा मयुरेश केळकर यांनी सांभाळली असून गाण्याचे बोल जाफर सागर लिखित असून त्यापैकी एक गाणे विष्णू थोरे यांनी लिहिले आहे. तर हा भव्य ॲक्शनपट के. प्रवीण याने त्याच्या कॅमेऱ्यात कैद केला आहे. टिझर पाहून प्रेक्षकांची चित्रपटाची उत्सुकता आणखीनच ताणली गेली आहे.

# जम्मू आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात अभिनेता संदीप पाठकचा सन्मान!

अभिनेता संदीप पाठकने(SANDIP PATHAK) त्याच्या अभिनय शैलीच्या जोरावर प्रेक्षकांच्या मनात स्वतःचं हक्काचं स्थान निर्माण केलं आहे. संदीप पाठकच्या राख चित्रपटाची चर्चा सुरु आहे. अलीकडच्या अनेक राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवांतून ‘राख’(RAKH) चित्रपटातील भूमिकेसाठी अभिनेते संदीप पाठकला गौरविण्यात आले आहे. अशातच आता जम्मू आंतराष्ट्रीय चित्रपट महोत्सवातही संदीप पाठक याला सर्वोत्कृष्ट अभिनेत्याचा पुरस्कार पटकावत आपल्या यशाची मालिका सुरुच ठेवली आहे. 15 देशांचे 54 चित्रपट या आंतरराष्ट्रीय महोत्सवासाठी निवडण्यात आले होते. या संदर्भात पुरस्कार स्वीकारल्यानंतर संदीप पाठकसुद्धा व्यक्त झाला आहे. ‘आपण केलेल्या कष्टाला जेव्हा कौतुकाची थाप मिळते. तो क्षण भाग्याचा असतो. हा पुरस्कार मला मिळाला असला तरी आमच्या संपूर्ण टीमचे हे श्रेय आहे. एक वेगळी कलाकृती सादर करण्याचा आमच्या टीमचा हा प्रयत्न यशस्वी झाला असून विविध महोत्सवांमध्ये घेतली जाणारी ‘राख’(RAKH) चित्रपटाची दखल आम्हाला सुखावणारी असल्याचे संदीप पाठक म्हणाला.



संदीप पाठक नेहमीच चित्रपटांमधून विविध भूमिका साकारताना दिसतो. त्याने साकारलेल्या भूमिकांना प्रेक्षकांची सुद्धा पसंत मिळते. दरम्यान, ‘राख’ या चित्रपटाचं दिग्दर्शन राजेश चव्हाण यांनी केलंय. लवकरच ‘राख’ चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे.

# भारताचा विजय तर हाँगकाँगची समाधानकारक खेळी!

## सूर्यकुमार, विराटच्या कामगिरीमुळे टीम इंडियाचे सुपर-4 मधील स्थान पक्के



। दुबई ।
महाईन्यूज ।

आशिया चषक स्पर्धेत भारताने हाँगकाँगवर ४० धावांनी दणदणीत विजय मिळवला आहे. भारताने हाँगकाँगसमोर विजयासाठी १९३ धावांचे लक्ष्य ठेवले होते. मात्र ही धावसंख्या गाठताना हाँगकाँगच्या फलंदाजांची दमछाक झाली. मात्र हार न मानता हाँगकाँगने समाधानकारक खेळी केली. या विजयासह भारताने सुपर-४ मध्ये आपले स्थान कायम केले आहे. भारताच्या आजच्या विजयाचे खरे शिल्पकार सूर्यकुमार यादव आणि विराट कोहली ठरले. दोघांनीही नाबाद अर्धशतकी खेळी करत हाँगकाँगसमोर धावांचा डोंगर उभा केला. भारताने दिलेल्या १९३ धावांचे लक्ष्य गाठताने हाँहकाँग संघाची दमछाक झाली. सलामीला आलेले निझाकत खान (१०), यासीम मुर्तझा (९) स्वस्तात बाद झाले. त्यानंतर बाबर हयातने संघाला सावरण्याचा प्रयत्न केला. त्याने मोठे फटके मारण्याचा प्रयत्न केला मात्र रवींद्र जडेजाच्या चेंडूवर तो झेलबाद झाला. त्याने ३५ चेंडूंमध्ये ४१ धावा केल्या. त्यानंतर एजाज खान (१४), शिशान अली (२६, नाबाद) यांनी संघासाठी धावा करण्याचा प्रयत्न केला मात्र त्यात ते अपयशी ठरले. हाँगकाँगला २० षटकांमध्ये १५२ धावा करता आल्या.

याआधी हाँगकाँगने नाणेफेक जिंकल्यानंतर अगोदर गोलंदाजीचा निर्णय घेतला. त्यानंतर फलंदाजीसाठी आलेल्या भारताने धमाकेदार कामगिरी केली. भारताचे विराट कोहली (५९) आणि सूर्यकुमार यादव (६८) चांगलेच तळपले. त्यांनी नाबाद अर्धशतकी खेळी करत भारताचा धावफलक १९२ धावांवर नेऊन ठेवला. तर याआधी रोहित शर्मा (२१) आणि केएल राहुल (३६) यांनी समाधानकारक कामगिरी केली. मोठा फटका मारण्याचा प्रयत्न करताना ते झेलबाद झाले. भारताने वीस षटकांत दोन गडी गमावून १९२ धावा केल्या.

हाँगकाँगचे गोलंदाज भारतीय फलंदाजांना रोखू शकले नाही. सूर्यकुमार यावने तर षटकार आणि चौकार यांचा पाऊस पाडत अवघ्या २६ चेंडूंमध्ये ६८ धावा केल्या. त्याने सहा चौकार आणि सहा षटकार लगावले. आयुष शुक्ला, मोहम्मद गझनफर यांनी प्रत्येक एका भारतीय फलंदाजाला बाद केले. त्यानंतर हाँगकाँगच्या एकाही गोलंदाजाला भारतीय फलंदाजांना रोखता आले नाही.

## शॉर्ट न्यूज »

### माझ्या यशामध्ये धोनीचा सिंहाचा वाटा; हार्दिक पंड्या

यूएई । महाईन्यूज

यूएईमध्ये होत असलेल्या आशिया चषक स्पर्धेमध्ये अटीतटीच्या लढती होत आहेत. भारताचे खेळाडूदेखील पूर्ण ताकदीने मैदानात उतरत आहेत. भारताने पाकिस्तानविरोधील आपला पहिलाच सामना पाच गडी राखून जिंकला. या सामन्यात अष्टपैलू खेळाडू हार्दिक पंड्याने धडाकेबाज कामगिरी केली. त्याने फलंदाजी तसेच गोलंदाजी अशा दोन्ही विभागात चांगला खेळ करत भारताला विजय मिळवून दिला. दरम्यान, या नेत्रदीपक कामगिरीनंतर हार्दिक पंड्याने त्याच्या यशामध्ये भारताचा माजी कर्णधार महेंद्रसिंह धोनी याचा सिंहाचा वाटा आहे, असे म्हटले आहे. माझ्या चांगल्या कामगिरीमागे महेंद्रसिंह धोनीचा सिंहाचा वाटा आहे, असे हार्दिक पंड्या म्हणाला आहे. "मी त्यावेळी अगदीच नवखा होतो. मी तेव्हा जगणं तसेच खेळ शिकत होतो. माझ्या प्रगतीमागे महेंद्रसिंह धोनीचा सिंहाचा वाटा आहे. जेव्हा-जेव्हा मला संधी मिळाली तेव्हा-तेव्हा मी धोनीच्या खेळाचे निरीक्षण करत राहिलो.

# रोड सेफ्टी वर्ल्ड सिरीजचे दुसरे पर्व 10 सप्टेंबर ते 2 ऑक्टोबरमध्ये होणार

। न्यूयॉर्क। महाईन्यूज ।



आशिया चषकानंतर पुन्हा एकदा रोड सेफ्टी वर्ल्ड सिरीजचे दुसरे पर्व सुरू होणार आहे. येत्या 10 सप्टेंबर ते 2 ऑक्टोबर या कालवधीत हे पर्व पार पडणार आहे. विशेष म्हणजे दुसऱ्या पर्वात पुन्हा एकदा मास्टर ब्लास्टर सचिन तेंडुलकरकडे भारतीय लीजेंड्सचे नेतृत्व देण्यात आले आहे. मागील पर्वात भारतीय लीजेंड्स संघाने रोड सेफ्टी वर्ल्ड सिरीजचे जेतेपद पटकावले होते.

रोड सेफ्टी वर्ल्ड सिरीजचा दुसरा पर्वात सचिन तेंडुलकर आणि युवराज सिंह यांच्यासह सर्व माजी दिग्गज खेळाडू पुन्हा एकदा मैदानात दिसणार आहेत. या स्पर्धेतील पहिले सात सामने 10 ते 15 सप्टेंबर दरम्यान लखनौच्या स्टेडियमवर खेळवले जाणार आहेत. यानंतर पुढील 5 सामने 16 ते 19 सप्टेंबर दरम्यान जोधपूरमध्ये खेळवण्यात येणार आहेत. त्यानंतर 6 सामने 21 ते 25 सप्टेंबर या कालवधीत कटकमध्ये होणार आहे. या सिरीजचे शेवटचे आणि नॉकआऊट सामने 27 सप्टेंबर ते 2 ऑक्टोबर दरम्यान हैदराबादमध्ये खेळवले जाणार आहेत.

या सिरीजच्या पहिल्या सत्रात 7 संघ सहभागी झाले होते. 'न्यूझीलंड लीजेंड्स' या आणखी एका संघाचा या स्पर्धेत समावेश करण्यात आला आहे. इंडिया लिजेंड्स, ऑस्ट्रेलिया लीजेंड्स, श्रीलंका लीजेंड्स, वेस्ट इंडिज लीजेंड्स, दक्षिण आफ्रिका लीजेंड्स, बांगलादेश लीजेंड्स, इंग्लंड लीजेंड्स आणि न्यूझीलंड लीजेंड्ससह एकूण 8 संघ या हंगामात खेळणार आहेत. या हंगामातही सचिन तेंडुलकरच पुन्हा एकदा भारतीय लीजेंड्स संघाचं नेतृत्व करताना दिसणार आहे. सचिनसोबत युवराज सिंह, इरफान पठाण, युसूफ पठाण, राहुल शर्मा हे खेळाडूही असणार आहेत. या सिरीजसाठी 7 सप्टेंबरपर्यंत सर्व खेळाडू लखनऊमध्ये दाखल होणार असल्याची माहिती मिळते. रोड सेफ्टी वर्ल्ड सिरीजच्या पहिल्या हंगामात सचिन तेंडुलकरने इंडिया लीजेंड्स संघाचे कर्णधारपद संभाळले होते. रोड सेफ्टी वर्ल्ड सिरीजच्या पहिल्या हंगामात भारत, श्रीलंका, दक्षिण आफ्रिका आणि वेस्ट इंडिजनं उपांत्य फेरी गाठली. त्यानंतर भारत आणि श्रीलंकेचा यांच्यात रायपूरमध्ये अंतिम सामना रंगला.

महाईन्यूज
जाहिरात आणि बातम्यांसाठी संपर्क
96577 67000

महाईन्यूज नोंद असू द्या..
महाईन्यूजची डिजीटल आवृत्ती छपाईसाठी नाही